# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०५.०७.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०४.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून १३,५३०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०९ इसमांवर कारवाई करुन ६,७४,१९०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,६३४ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,५४,५००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगीरी :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस त्वरित अटक.**

दिनांक ०४.०७.२०२६ चे ०१ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत प्लॉट नं. ५५, लालाजी डहारेचे घरी किरायाने, जमील सोसायटी, एलआयसी कॉलोनी समोर, गोधनी रेल्वे, मानकापुर येथे राहणारे फिर्यादीचे पती नामे मेहताबसिंग सोहनलाल चौधरी, वय ४३ वर्षे हे त्यांचे घराचे लोखंडी पत्र्याचे शेडमध्ये झोपलेले असतांना, कोणीतरी काळ्या रंगाचे हाफ टि—शर्ट व हाफ बरमुडा घातलेल्या ईसमाने कुऱ्हाडीसारख्या धारदार शस्त्राने फिर्यादीचे पतीचे डोक्यावर वार करुन, त्यांना जिवानिशी ठार केले. फिर्यादी श्रीमती गिता मेहताबसिंग चौधरी, वय ४० वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे आरोपीविरूध्द कलम १०३(१),३३३ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात, गुन्हेशाखा युनिट ५ चे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशिर माहीतीवरून आरोपी हा मृतक याचे मुलीचा दुसरा पती असल्याचे निष्पन्न केले व तांत्रीक तपास करून त्याचा शोध घेवून त्यास ताब्यात घेतले. तपासात मृतक हा त्याची मुलगी नामे पल्लवी हीला तीच्या पहील्या पतीकडे जाण्यासाठी वारंवार आग्रह करीत असल्याने आरोपी रोहीत हरीप्रसाद गौतम वय २५ वर्षे, रा. मानकापूर, नागपूर याने त्याचा राग मनात धरून खुन केल्याचे समजले. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव मानकापूर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अती.कार्य.

गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, सपोनि कदम, पोहवा. चंद्रशेखर, नजीर, राजा, राजु, गणेश, विशाल, राठोड, अनिस, पोअं. आशिष, अमोल व लिलाधर यांनी केली.



**३) कुख्यात गुंड हद्दपार :—**

पोलीस ठाणे हुडकेश्वर हददीत, **संजय गांधी चौक, दत्तु किराणा स्टोअर्स जवळ, मानेवाडा, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे गोकुल उर्फ गोलू जगदीश बडवाईक, वय २४ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे नंदनवन, हुडकेश्वर येथे जबरी चोरी, दुखापत करणे, मारपिट करणे, दरोड्याची तयारी ईत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता हुडकेश्वर पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०४ नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०४, यांनी हददपार आदेश क्र. ०४/२०२६ दिनांक ०२.०७.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतुन ०६ महिण्याकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगारास हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असून त्यास त्याचे नातेवाईकाकडे राळेगाव, यवतमाळ येथे सोडण्यात आले आहे.



**४) तहसील पोलीसांची कामगिरी :— अग्नी शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०४.०७.२०२६ चे २२.०० वा. चे सुमारास, तहसील पोलीसांचे पथक पेट्रोलिंग करीत असता त्यांना मिळालेल्या माहीतीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, गार्ड लाईन, डी/५३ निवासस्थानाजवळ आमरोडवर मिळालेल्या वर्णनाचा ईसम दिसल्याने त्यास थांबवून पंचासमक्ष नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव इमरान उर्फ टिपू शेख वल्द वकील शेख वय ३५ वर्षे रा. ईतवारी, दहीबाजार ह.मु. फ्लॅट नं. १०३, फलक प्लाझा, रफीक चौक, यशोधरानगर, नागपूर असे सांगितले. त्याची पंचासमक्ष अंग झडती घेतली असता, त्याचे ताब्यात देशी बनावटीचे ०१ अग्नीशस्त्र मॅगझीनसह व ०२ जिवंत काडतुसे मिळुन आल्याने. आरोपीचे ताब्यातुन एकुण किंमती ५२,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्नीशस्त्र जिवंत काडतुससह बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरूध्द कलम ३, ५(१)(अ), २५, २५(१)(अ), ७, २७ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्रीमती अनिता मोरे, सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली

विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. संजय मेंढे, पोउपनि. अनिल ठाकुर, मनिष शहाकार, पोहवा. राम, विनोद, पोअं. पंकज व मपोहवा प्रांजली यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे सक्करदरा :— खंडणी मागणाऱ्या आरोपीस अटक.**

फिर्यादी मोहित मिलींद पारधी, वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. ११०, ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रिंग रोड, नागपूर यांना प्लॉट खरेदी करायचा असल्याने त्यांनी मार्च २०२५ मध्ये आरोपी क्र. १) कमलेश गणपतराव हनोते वय ४२ वर्षे, रा. ई.पी.एफ. ऑफीस मागे क्वॉर्टर नं. १८३/४, सोमवारी क्वॉर्टर, सक्करदरा, नागपूर याचेसोबत प्लॉटचा ४८ लाख रूपयामध्ये सौदा करून त्यास वेळोवेळी एकुण तीस लाख रूपये दिले होते. आरोपी याने फिर्यादी यांना पुर्ण रक्कम मिळाल्यावर रजिस्ट्री करून देतो असे सांगितले. फिर्यादी यांना त्यांचे डिलीव्हरी पार्सल व्यवसायासाठी पैशाची आवश्यकता असल्याने, आरोपी यास मे २०२५ मध्ये पैसे परत मागितले असता, आरोपीने पैसे परत मिळणार नाही असे सांगून, त्याची परिचीत साथीदार आरोपी क्र. २) अनिता पूरनलाल भारद्वाज वय ४३ वर्षे, रा. पिपला फाटा, हुडकेश्वर हिचेशी ओळख करून देवून ती १० टक्के दरमहा व्याजाने रक्कम देते असे सांगितले. फिर्यादी यांनी १ लाख रूपये घेवून एक महिण्या नंतर व्याजासह रक्कम परत केली होती. जुलै २०२५ मध्ये फिर्यादी यांना पुन्हा अडचण असल्याने त्यांनी आरोपी कडुन ३ लाख रूपये व्याजाने घेतले. रक्कम परत करण्यास उशीर झाल्याने फिर्यादी यांनी आरोपींना फोन केला असता, आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून धमकी दिली. व रक्कम न दिल्यास मुद्दल व व्याज दुप्पट होईल असे सांगून इतर प्रकरणात अडकविण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादीचे घरी अनोळखी लोकांना पाठवून फिर्यादी व त्यांचे कुटूंबाना शिवीगाळ करून धमकी दिल्याने फिर्यादीने घाबरून वेळोवेळी असे एकुण ३ लाखच्या मोबदल्यात १५ लाख रूपये आरोपींना परत केले. तरी सुध्दा आरोपी हे फिर्यादीस वारंवार खंडणीची मागणी करून, न दिल्यास फिर्यादीस जिवे ठार मारण्याची धमकी देतात.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. प्रविण वाकडे ७५८८५३७१९२ यांनी आरोपींविरूध्द कलम ३०८(५),३५२,३(५) भा.न्या.सं. सहकलम ३९ महाराष्ट्र सावकारी अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करून, त्वरीत दखल घेवुन, आरोपी क्र. १ यास अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०६.२०२६ चे ०७.०० वा. ते दिनांक ०४.०७.२०२६ चे ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट नं. २३, मंगलधाम कॉलोनी, लाडीकर राम मंदीर जवळ, नागपूर येथे राहणारे फिर्यादीचे वडीलांना उपचाराकरीता दवाखान्यात दाखल केल्याने त्यांचे आईने घराला कुलुप लावुन दवाखान्यात गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे वडीलांचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख १५,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने व चांदीचे सिक्के असा एकुण किंमती २,७२,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी अभिजीत राजेश पाचकवडे वय ३६ वर्ष रा. लिव्हरेज, ग्रिनगुड्स, बेसा पिपळा रोड, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. साखरकर ९३२२२२४२४५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**पोलीस ठाणे नवीन कामठी :–** दिनांक ०५.०७.२०२६ चे ०७.५४ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, लिहीगाव समोर, सर्व्हीस रोडचे बाजुला, कुलर कंपनीजवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता उपजिल्हा रुणालय, कामठी येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यāप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे पोउपनि. झगडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

## (मिसिंग)

**१) पोलीस ठाणे शांतीनगर :–** सौ. हिना शरद कछवाह, वय ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. १४, साई नगर, शांतीनगर, नागपूर ह्या दिनांक २५.०६.२०२६ चे ०७.०० वा. पासुन पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– गोल, बांधा– मजबूत, उंची– ५ फुट ४ इंच, केस– काळे लांब, अंगात– सलवार सुट घातलेले आहे. भाषा– हिंदी बोलतात.

**२) पोलीस ठाणे शांतीनगर :–** शैलेष ताराचंद कोलटकर वय २१ वर्षे, रा. तांडापेठ, चंद्रभागानगर, पाचपावली, नागपूर हे दिनांक २९.०६.२०२६ चे १३.०० वा. पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीतील ईतवारी रेल्वे स्टेशन, नागपूर येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट २ इंच, केस– काळे, अंगात– ग्रे रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतो.

**३) पोलीस ठाणे शांतीनगर :–** हर्षल लक्ष्मीकांत पौनिकर वय २६ वर्षे, रा. लालगंज बाहुली विहीरजवळ, नागपूर हे दिनांक १५.०६.२०२६ चे ०५.०० वा. पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– लांबट, बांधा– साधारण, उंची– ५ फुट ३ इंच, केस– काळे, अंगात– ब्राऊन रंगाचा शर्ट व ग्रे रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतो.

**४) पोलीस ठाणे शांतीनगर :–** प्रगती श्रावण मोहाडीकर, वय १९ वर्षे, रा. लालगंज, राऊत चौक, सातपूते मोळल्ला, नागपूर ही दिनांक २२.०१.२०२६ चे ११.३० वा. पासुन पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– गोल, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट २ इंच, केस– काळे लांब, अंगात– पांढरी कुर्ती, पिवळा प्लाझो घातलेली आहे. भाषा–मराठी/ हिंदी बोलतात.



हिना



शैलेष



हर्षल



प्रगती

स्वा/—

( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.